आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्तविभाग
राष्ट्रीय बातमीपत्र
सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

दिनांक : 13.11.2026 **वार : शुक्रवार**

---

1. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार प्रदान करणार
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून कर्नाटक आणि गुजरातच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर
3. 45व्या भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळाव्याचं आज नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं उद्घाटन
4. देशभरात आजपासून छट पूजा उत्सवाला सुरुवात आणि
5. 19 वर्षांखालील मुलांच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारत अंतिम फेरीत.

राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज राष्ट्रपती भवनात राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. बॅडमिंटनपटू ट्रीसा जॉली आणि पुलेला गायत्री गोपीचंद यांच्यासह विविध क्रीडा प्रकारातील अन्य पंधरा खेळाडूंना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी अर्जुन पुरस्कारानं सन्मानित करण्यात येणार आहे. ज्येष्ठ फुटबॉलपटू इसाया अरुमानायगम यांना अर्जुन पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून ॲथलेटिक्स प्रशिक्षक परवीर सिंग, मुष्टियुद्ध प्रशिक्षक छोटे लाल यादव आणि नेमबाजी प्रशिक्षक नेहा चव्हाण यांना द्रोणाचार्य पुरस्कारानं सन्मानित करण्यात येणार आहे. याशिवाय पुण्याच्या आर्मी पॅरालिम्पिक विभागाला राष्ट्रीय खेल प्रोत्साहन पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

पंतप्रधान-कृषी परिषद

विकसित भारतासाठी कृषी क्षेत्राचा विकास, आधुनिक शेती आणि शेतकऱ्यांचं सक्षमीकरण महत्त्वाचं आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते काल नवी दिल्लीत भारत कृषी परिषदेला संबोधित करताना बोलत होते. बदलत्या काळानुसार केवळ धान्याची कोठारं भरणं पुरेसं नसून शेतकऱ्यांना 'कृषी उद्योजक' बनवण्यावर सरकारचा भर असल्याच मोदी यांनी सांगितलं. भारताची वार्षिक कृषी निर्यात 4 लाख कोटी रुपयांच्या पुढे गेली असून, दूध, डाळी, तांदूळ आणि धान्य उत्पादनात भारत जगात पहिल्या क्रमांकावर पोहोचला आहे, असं त्यांनी सांगितलं. गेल्या दशकभरात ग्रामीण भागातील गरिबी कमी होऊन 50 कोटी भारतीय दारिद्र्यातून बाहेर पडल्याचा उल्लेख त्यांनी केला; ते म्हणाले.....

गाँवों में बहुत तेजी से गरीबी कम हुई है यानि बडी संख्या में छोटे किसान ने, खेत मजदूर ने, गरीबी को हराया है। अब संयोग देखिए बीते दशक में भारत में कृषि की विकास दर 4% से ऊपर रही है, ये आजादी के बाद पहला दशक है, जब देश के एग्रीकल्चर सेक्टर ने 4% से अधिक की औसत ग्रोथ हासिल की है। आजादी के बाद पहली बार गांवों में बड़ी संख्या में गरीबों ने गरीबी को परास्त किया है।

दोन दिवसांच्या या परिषदेत देशभरातील सुमारे दोन हजार शेतकरी आणि कृषी शास्त्रज्ञ सहभागी झाले आहेत.

पीएम दौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून कर्नाटक आणि गुजरातच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. ते आज सकाळी स्वामी विवेकानंद योग संशोधन संस्थानचं निवासी मुख्यालय असलेल्या 'प्रशांती कुटीरम'च्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्यात सहभागी होतील. तर दुपारी पंतप्रधान तावरेकेरे ते आयआयएम बंगळुरू, मेट्रो सेवेला हिरवा झेंडा दाखवतील. ते या मेट्रोने प्रवासही करणार आहेत. यानंतर पंतप्रधानांच्या हस्ते बंगळुरूमध्ये 15 हजार 600 कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विविध

विकास प्रकल्पांची पायाभरणी, काही प्रकल्पांच उद्घाटन आणि लोकार्पण करण्यात येईल. पंतप्रधान म्हैसूरलाही भेट देणार असून, 'भारत वन' इथल्या वृक्षारोपण कार्यक्रमात सहभागी होतील. संध्याकाळी त्यांच्या हस्ते 'कॉसमॉस-म्हैसूर तारांगणा'चं उद्घाटन होईल. उद्या पंतप्रधान गुजरातच्या बनासकांठा इथल्या अंबाजी मंदिरात जाऊन पूजा करतील.

उपराष्ट्रपती

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आज आंध्र प्रदेशातल्या विशाखापट्टणमला भेट देणार आहेत. तिथं ते 'सीआयआय पार्टनरशिप समिटच्या 31 व्या आवृत्तीच्या समारोप सत्राला संबोधित करणार आहेत. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय, आंध्र प्रदेश सरकार आणि सीआयआय यांनी संयुक्तपणे याचं आयोजन केलं आहे. या परिषदेत विविध देशांतील धोरणकर्ते, मंत्री, व्यावसायिक आणि राजनैतिक प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. जागतिक गुंतवणूक भागीदारी अधिक दृढ करणं, तसंच 'विकसित भारत' आणि 'विकसित आंध्र प्रदेश'च्या उद्दिष्टांना बळ देणं, हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे.

व्यापार मेळावा

45 व्या 'भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळाव्याच उद्घाटन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियूष गोयल यांच्या हस्ते आज नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं होणार आहे. या मेळ्यात 32 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश, 11 देश आणि साडेतीन हजार हून अधिक प्रदर्शक सहभागी होणार आहेत. महाराष्ट्र, बिहार, राजस्थान आणि उत्तर प्रदेश ही भागीदार राज्ये असणार आहेत. विकास आणि वारसा या संकल्पनेवर आधारित हा व्यापार मेळावा येत्या 27 नोव्हेंबर पर्यत सुरु राहणार आहे.

व्यापारमेला

दरम्यान या आंतरराष्ट्रीय व्यापार मेळ्यामध्ये भागीदार राज्य म्हणून सहभागी झालेल्या महाराष्ट्राच्या भव्य दालनाचं उद्घाटन उद्या संध्याकाळी राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते होणार आहे. महाराष्ट्राचा समृद्ध वारसा, उद्यमशीलता आणि आधुनिक प्रगतीचा संगम ही या दालनाची मध्यवर्ती संकल्पना आहे. महाराष्ट्राच्या औद्योगिक आणि पायाभूत विकासाची माहिती देणारे विशेष विभाग या दालनात उभारण्यात आले असून राज्यातील आधुनिक वाहतूक सुविधांची माहिती, तसंच आधुनिक शेती आणि अक्षय ऊर्जा क्षेत्रातील राज्याच्या प्रगतीचे चित्रणही करण्यात आलं आहे.

कॅब नियम

रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयानं कॅब भाड्यानं देण्याच्या व्यवसायाचे नियम सोपे करण्यासाठी, व्यवसाय सुलभतेला चालना देण्यासाठी आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी सुधारणांचा प्रस्ताव ठेवला आहे. या प्रस्तावित सुधारणांनुसार, कॅब ऑपरेटर्सना चालकांसहित किंवा चालकांशिवाय कॅब चालवण्याची परवानगी दिली जाईल. वाहनांच्या ताफ्याची किमान आवश्यकता 50 वरून पाच वाहनांपर्यंत कमी केली जाईल. पाच पर्यटन शहरांमध्ये शाखा असण्याची अट काढून टाकण्यात आली आहे.

नीती आयोग अहवाल

नीती आयोगानं 'उत्पादन-आधारित प्रोत्साहन योजनांच्या परिणामांचं मूल्यांकन' या नावानं एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. अहमदाबाद इथल्या भारतीय व्यवस्थापन संस्थेच्या सहकार्यानं हा अहवाल तयार करण्यात आला आहे. यामध्ये भारतातील उत्पादन क्षेत्र, गुंतवणूक, निर्यात आणि रोजगाराच्या बाबतीत झालेली लक्षणीय वाढ अधोरेखित करण्यात आली आहे. या योजनांमुळं 14 लाख 15 हजारांहून अधिक प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगारांच्या संधी निर्माण झाल्या आहेत असं अहवालात सांगण्यात आलं आहे. तसंच प्रगत रसायन सेल बॅटरी, वस्त्रोद्योग आणि आयटी हार्डवेअर यांसारख्या क्षेत्रांत सुधारणेची गरज असल्याचंही या अहवालात सांगण्यात आलं आहे.

गोवा इफ्फी

57 व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या तयारीला आजपासून गोव्यात सुरुवात होत आहे. या निमित्तानं आज पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली आहे. नऊ दिवस चालणारा हा महोत्सव 20 ते 28 नोव्हेंबर दरम्यान होणार आहे.

छटपूजा

देशभरात आजपासून चार दिवस चालणाऱ्या छट पूजेला सुरुवात होत आहे. नाहाय खाय या विधीने या पर्वाची सुरुवात होते. सूरीदेव आणि छटी मैया यांना समर्पित असलेला हा सण नदी किनारी साजरा केला जातो. उगवत्या सूर्याला अर्घ्य देऊन सुरू झालेल्या या उत्सवाची सांगता चार दिवसांनंतर मावळत्या सूर्याला अर्घ्य देऊन केली जाते. कडक उपवास, दरदिवशी वेगळा प्रसाद आणि प्रार्थना असं या उत्सवाचं स्वरूप असतं.

टिबी

क्षयरोग निर्मूलनाच्या लढाईत भारतानं एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला असून, क्षयरोगामुळे होणाऱ्या मृत्यूंच्या संख्येत 2015 पासून 38 टक्क्यांनी घट नोंदवली आहे. जागतिक स्तरावर क्षयरोगामुळे होणाऱ्या मृत्यूंच्या संख्येत 35 टक्क्यांनी घट झाली आहे, त्यापेक्षा भारतातील मृत्यू दरातील घट अधिक आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या काल प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार भारतानं क्षयरोगग्रस्त रुग्णांच्या उपचारांमध्ये 94 टक्के इतका उल्लेखनीय यश दर गाठला आहे. राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमा अंतर्गत राबवण्यात आलेल्या विविध उपाययोजनांमुळे हे शक्य झालं असं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं म्हटलं आहे.

युक्रेन

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी युक्रेन शांतता चर्चेच्या पुढील फेरीत युरोपीय प्रतिनिधींना सहभागी करून घेण्यास संमती दिली आहे. क्रेमलिनमध्ये पुतिन यांची भेट घेतल्यानंतर चर्चेनंतर अमेरिकेचे दूत स्टीव्ह विटकॉफ यांनी पत्रकारांना ही माहिती दिली.

भारत-इंडोनेशिया दहशतवाद

भारत आणि इंडोनेशिया यांनी दहशतवादाला प्रतिबंध करण्यासंदर्भात द्विपक्षीय सहकार्याचं महत्व आधोरेखित केलं आहे. दहशतवाद विरोधी विषयांवरील भारत इंडोनेशिया संयुक्त कार्य गटाची सातवी बैठक काल नवी दिल्ली इथं पार पडली. सर्व प्रकारच्या दहशतवादाचा दोन्ही बाजूंनी तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.

क्रिकेट-आशिया चषक

19 वर्षांखालील मुलांच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारतानं अफगाणिस्तानला 8 गडी राखून पराभूत करत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.ओमान इथं झालेल्या उपांत्य सामन्यात अफगाणिस्ताननं प्रथम फलंदाजी करताना 50 षटकात 8 बाद 227 धावा केल्या. भारतानं 2 गड्यांच्या मोबदल्यात सदतिसाव्या षटकात हे लक्ष्य पार केलं. स्पर्धेच्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात पाकिस्ताननं बांगलादेशावर 9 गडी राखून विजय मिळवला. या स्पर्धेचा अंतिम सामना उद्या भारत आणि पाकिस्तान यांच्यात होणार आहे.

क्रिकेट

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील मर्यादित षटकांच्या मालिकेतील चौथा सामना आज होत आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार आज सकाळी साडे सात वाजता सामन्याला सुरूवात झाली. भारतानं नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. 5 सामन्यांच्या मालिकेत भारत 2-0 आघाडीवर आहे.

या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.